# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/02/2024 (शुक्रवार) सकाळ

---

## लोखंडी प्लेटा चोरी करणारे आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

फिर्यादी नामे वंजा राजेश चौधरी वय ३१ वर्ष रा. भिवापूर यांनी पोस्टे भिवापूर ला तोंडी रिपोर्ट दिली कि, मौजा सालेशहरी (पू) ता. भिवापूर येथील BSNL टॉवर जवळील ०६ लोखंडी प्लेटा कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे. अशा रिपोर्ट वरून पोस्टे भिवापूर येथे अप. क्रमांक ६२/२०२४ कलम ३७९ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यामधिल अज्ञात आरोपीचे शोध करणे कामी सपोनि. प्रमोद चौधरी ठाणेदार पोस्टे भिवापूर, पोहवा राकेश त्रिपाटी, पोना रविंद्र जाधव, पोशि वासुदेव समर्थ नी शोध घेतला असता नमुद गुन्ह्यातील आरोपी हे मौजा मानोरा शिवारात चोरीस गेलेला माल घेवून मो.सा. क्रमांक एम. एच. –३१/सी. सी –७६४३ ने उमरेड कडे जातांना पकडले. त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव **१) चंद्रशेखर जयपाल उके, वय ३४ वर्ष रा. मानोरा ता. भिवापूर जिल्हा नागपूर २) ईसाग अहमद खाँ पठान वयं ३२ वर्ष रा. कारगाव ता. भिवापूर जिल्हा नागपूर** असे सांगितले. त्यांना सदर गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली असून त्यांचे कडून गुन्ह्यातील चोरीस गेलेला माल व मो.सा, असा एकूण ३०,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले असून सदर आरोपी हे मा. न्यायालयीन कस्टडी मध्ये आहे. पूढील तपास मा. ठाणेदार प्रमोद चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली नापोशि रविंद्र जाधव पोस्टे भिवापूर करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग, पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि. प्रमोद चौधरी, पोहवा राकेश त्रिपाठी, पोना रविंद्र जाधव, पोशि वासुदेव समर्थ, चापोशि सोरते यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर